## नियमित दिवाणी दावा क्र. ७६/२०२४ मधील निशाणी ३५ खालील आदेश
## (MHRT08-000520-2024)

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ०५, ०६,०९ व १५ यांच्या नावामध्ये दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

०२. अर्जात असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ०५, ०६,०९ व १५ यांच्यावर दाव्याची समन्सची बजावणी होवून ते हजर झाले आहेत. सदर प्रतिवादींची दाव्यामध्ये नजर चुकीने चुकीची नावे नमूद करण्यता आली आहेत. प्रतिवादी क्र. ०५ चे नाव सुरेखा मंगेश बोले असे नमूद असून त्याऐवजी मनस्वी मंगेश बोले असे दुरुस्त करणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. ०६ चे नाव कौशल कृष्णा वेलोंडे असे नमूद असून त्याऐवजी कौशल्य कृष्णा वेलोंडे असे दुरुस्त करणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. ०९ चे नाव नैना यशवंत सुर्वे असे नमूद असून त्याऐवजी नयना यशवंत सुर्वे असे दुरुस्त करणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. १५ चे नाव प्रकाश कृष्णा वेलोंडे असे नमूद असून त्याऐवजी प्रकाश कृष्णा येलोंडे असे दुरुस्त करणे गरजेचे आहे. सदरची दुरुस्ती केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नसून प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, अर्ज मंजूर करण्यास विनंती करण्यात आली आहे. अर्जाच्या पुष्ठयर्थ निशाणी क्र. ३६ अन्वये शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर विरुध्द पक्षाचे म्हणणे मागविजले. सर्व प्रतिवादींतर्फे सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा, असे म्हणणे सादर करण्यात आले आहे.

०४. दोन्ही बाजूंना ऐकले. अभिलेख पाहिले. प्रस्तुतचा दावा हा निरंतरच्या मनाईसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ०५, ०६, ०९ व १५ यांनी निशाणी २० ते २३ अन्वये त्यांचे नाव चुकले असलेबाबत पुरसिस दाखल केली आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. दावा अद्याप प्राथमिक स्थीतीत प्रलंबित आहे. अर्जातील मागणी पाहता, दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नसून प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे दिसून येते. सबब, न्यायाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**आदेश**

१. अर्ज निशाणी ३५ खर्चाविना मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात मागितलेली दुरुस्ती मुदतीत करुन दुरुस्तीप्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.06.17 16:39:07 +0530

**(श्रीमती आर. आर. कुलकर्णी)**

**दि. १७/०६/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवरुख**

| -: **<u>CERTIFICATE</u>** :- | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | S. A. Bhale |
| Court Name | : | Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 17/06/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 17/06/2025 |
| Order uploaded on | : | 17/06/2025 |